

# एससीडीएलचा सिल्वर जुबली कार्यक्रम

e Paper

दैनिक **मेट्रो सिटी वृत्तांत**

वर्ष 3रे

www.metrocityvrutant.in सोमवार दिनांक 12/05/२०२५ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 102 || RNI - MAHMAR51259 || metrocity924@gmail.com


# छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजकोट किल्ल्यावरील पुतळ्याचं अनावरण

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मुंबई : कोकणातील मालवणमधील राजकोट येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य दिव्य पुतळ्याचे अनावरण आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आलं. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, माजी केंद्रीय मंत्री नारायण राणे, मंत्री नितेश राणे यांच्यासह प्रमुख नेत्यांची उपस्थिती उद्घाटन सोहळा पार पडला.





मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राजकोट येथील पुतळा कोसळल्याच्या घटनेचा उल्लेख करुन या पुतळ्याची उभारणी करणार असा निर्धार आम्ही केला होता असं वचन आम्ही महाराष्ट्राला दिलं होतं. त्यानंतर ९१ फुटांचा हा पुतळा तयार करण्यात आला आहे. किमान १०० वर्षे या पुतळ्याला काही होणार नाही असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

आज आमच्यासाठी अत्यंत आनंदाची आणि समाधानाची बाब आहे की राजकोट किल्ल्यावरचा छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा त्याच तेजाने आणि त्याच स्वाभिमानाने आणि भव्यतेने उभा झाला आहे. मागच्या काळात दुर्दैवी घटना घडली होती. त्यावेळी आमच्या सरकारने निर्धार केला होता की विक्रमी वेळेत आम्ही हा पुतळा पुन्हा प्रस्थापित करु. आम्ही अक्षरशः विक्रमी वेळेत हा पुतळा प्रस्थापित झाला आहे.आज आम्ही त्याचं पूजन केलं आहे. मी सार्वजनिक बांधकाम विभागाचं अभिनंदन करतो असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. शिल्पकार सुतार यांनी अतिशय उत्तम दर्जाचा हा पुतळा तयार केला आहे. त्यांच्यासह आयआयटीचे इंजिनिअर, जे. जे. स्कूल ऑफ आर्टचे लोक होते.

महाराजांना साजेसं स्मारक उभं करायचं हे ठरवलं होतं त्यानुसार आता पुतळा उभा राहिला आहे असंही फडणवीस म्हणाले.पुढील किमान १०० वर्ष हा पुतळा कुठल्याही प्रकारच्या वातावरणात टिकेल अशा प्रकारची याची रचना करण्यात आली आहे. तर त्याचे देखभालीचे काम ज्यांनी पुतळा तयार केला, त्यांच्याकडे पुढील १० वर्षे असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. त्यासंबंधीची हमी त्यांनी घेतली आहे. अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

# पाकिस्तान हा विश्वास ठेवण्याच्या लायकीचा देश नाही

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मुंबई : जगभरातून पाकिस्तानचा निषेध नोंदवण्यात आला. तर भारताकडून काय प्रत्युत्तर दिलं जातं? याची प्रतीक्षा सगळ्यांना होती. त्यानंतर ६ मे च्या रात्री भारताने पाकिस्तानावर एअर स्ट्राईक केला आणि चोख उत्तर दिलं. पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधले दहशतवादी तळ उद्ध्वस्त करण्यात आले.यानंतर पाकिस्तान आणि भारत यांच्यात युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली होती बहुदा युद्ध घोषित होईल अशी शक्यता निर्माण झाली होती. त्याचवेळी डोनाल्ड ट्रम्प यांनी मध्यस्थी केली आणि दोन्ही देशांची शस्त्रविराम केला. यानंतर काही तासातच पाकिस्तानने पुन्हा एकदा आगळीक केली. ज्यानंतर त्या



कारवाईलाही उत्तर देण्यात आलं. दरम्यान या सगळ्याबाबत आता प्रतिक्रिया येत आहेत. पाकिस्तान हा विश्वास ठेवण्याच्या लायकीचा देश नाही असं छगन भुजबळ यांनी म्हटलं आहे."पाकिस्तान काही विश्वास ठेवण्याच्या लायकीचा देश नाही. कधी जबाबदारी घेतात कधी नाकारतात. त्यांना जो धडा शिकवायचा तो आपण शिकवला आहे. लवकर काही कुरापती काढतील असं वाटत नाही. कारण दहशतवादी कारवाया करणाऱ्यांचे म्होरके संपले आहेत. पाकिस्तान डुबलेला देश आहे.त्यांचं आणखी काय नुकसान होणार? आपला देश वेगाने पुढे जाणारा देश आहे. शस्त्रविराम होत असेल तर चांगली गोष्ट आहे. ऑपरेशन सिंदूरमधून आपण दहशतवादी हल्ल्याचा बदला घेतला आहे. योग्य वेळी संघर्ष थांबला तर दोन्ही देशांकडचा फायदा असतो.जम्मू आणि काश्मीर या ठिकाणीही परिस्थिती पूर्ववत होते आहे. ही चांगली गोष्ट आहे. आपल्या लोकांवर जो दहशतवादी हल्ला झाला त्याचा पुरेपूर बदला भारताने घेतला आहे."

# अखेर चिखली, चऱ्होलीची 'टीपी स्कीम' रद्द होणार!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मौजे चिखली आणि चऱ्होलीत महानगरपालिका प्रशासनाची प्रस्तावित TP Schem अखेर रद्द होणार आहे. आयुक्त शेखर सिंह यांनी याबाबत सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. त्यामुळे भूमिपुत्र आणि ग्रामस्थांना दिलासा मिळणार आहे.

चिखली, चऱ्होली येथील प्रस्तावित 'टीपी स्कीम' बाबत भाजपा आमदार महेश लांडगे यांनी आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्यासोबत महत्त्वपूर्ण बैठक केली. सुमारे तीन तास सुरू असलेल्या बैठकीमध्ये लांडगे यांनी ग्रामस्थ, भूमिपुत्रांची भूमिका ठामपणे मांडली.

पिंपरी-चिंचवड शहराच्या स्थापनेपासून 3 ते 4 वेळा आमच्या भूमिपुत्रांच्या जमिनींचे शासनाच्या वतीने भूसंपादन करण्यात आले आहे. 1970 च्या दरम्यान औद्योगिक विकास महामंडळाने उद्योगधंद्यांसाठी भूसंपादन केले, हा पहिला अन्याय झाला. त्यानंतर पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाची स्थापना करुन आमचा विरोध असतानाही जमिनी ताब्यात घेतल्या. टाटा मोटर्स कंपनीच्या विस्तारासाठी पुन्हा आमच्या जमिनींवर भूसंपादनाची कारवाई केली. त्यावेळीही आम्ही आंदोलन उभा केले होते. 1997 मध्ये ग्रामस्थांचा विरोध असताना गावांचा समावेश महापालिका हद्दीत करण्यात आला. प्रत्येकवेळी भूमिपुत्रांवर अन्याय झाला आहे. त्यामुळे या भागात टीपी स्कीम लागू नये, अशी आग्रही भूमिका आमदार लांडगे यांनी आयुक्तांसमोर मांडली. प्रस्तावित टीपी स्कीमबाबत चिखली आणि चऱ्होली या दोन्ही गावातील ग्रामस्थांमध्ये प्रचंड असंतोष होता. आमदार महेश लांडगे यांनीही सातत्याने टीपी स्कीमला विरोध केलेला आहे. त्यामुळे 'टीपी स्कीम' बाबत काय निर्णय होतो? याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले होते. दरम्यान महापालिका आयुक्त रजेवर होते. आज आयुक्त महापालिकेत रुजू झाल्यानंतर तात्काळ बैठक घेण्यात आली. त्यामुळे आमदार महेश लांडगे यांच्या मागणीला यश मिळताना दिसत आहे.



**“ मौजे चिखली आणि चऱ्होलीत महानगरपालिका प्रशासनाने लादलेली TP Schem रद्द करण्याबाबत आम्ही संघर्षाची तयारी ठेवलेली आहे. आज झालेल्या बैठकीमध्ये आयुक्त शेखर सिंह यांनी सकारात्मक प्रतिसाद देत टीपी स्कीम रद्द होण्याबाबत 'ग्रीन सिग्नल' दिलेला आहे. लवकरच याबाबत प्रशासन 'नोटिफिकेशन' काढेल असा विश्वास आहे. भूमिपुत्रांवर कोणताही अन्याय होऊ देणार नाही मी कायम त्यांच्या सोबत आहे. ”**

- आमदार महेश लांडगे

# मी पुन्हा लोकसभा लढणार : शिवाजीराव आढळराव पाटील

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

नागरिकांच्या संपर्काच्या जोरावर मी पुन्हा येणार असून 2029 मध्ये जनतेला वाटले तर लोकसभा निवडणूक लढवू त्यात चुकीचे काय आहे, असे प्रतिपादन म्हाडाचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील यांनी केले, लांडेवाडी येथे शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेल्या पत्रकार परिषेदेत आढळराव पाटील यांनी विविध विषयांना स्पर्श केला. मागील 20 वर्षांच्या राजकारणात एक रुपया खाल्ल्याचा आरोप माझ्यावर झाला नाही. खासदार नसताना सुद्धा मंचर नगरपंचायतीसाठी 100 कोटींचा निधी आणला आहे. शहराच्या पाणीपुरवठा योजनेसाठी 136 कोटी मंजूर केले.



**» लोकसभेतील पराभवानंतरही मी राजकारणात व सामाजिक जीवनात सक्रिय आहे. सर्वसामान्य लौकोना भेटती, जनता दरबारात समस्या सोडवण्याचा प्रयत्न केला जातोय. गावागावांमध्ये विकास कामासाठी निधी उपलब्ध करून देत आहे. माझा पराभव जरी झाला असला तरी मी घरी बसलेलो नाही**

**शिवाजीराव आढळराव पाटील**
अध्यक्ष-पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (पुणे म्हाडा) (राज्यमंत्री दर्जा)
मा. खासदार शिरूर लोकसभा

मात्र काही जण मंचर नगरपंचायतीच्या कामात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करताहेत. या कामांची टेंडर निघून ती पूर्ण होत आली आहेत, मग आताच भ्रष्टाचाराचा आरोप कसा होतो, असा सवाल करून ते म्हणाले निवडणुका लवकरच होणार आहेत. काम करणार्या एका ठेकेदाराने मला सांगितले की, संबंधितांनी ठेकेदाराकडे 10 लाख रुपयांची मागणी केली होती. ते न दिल्यानेच भ्रष्टाचाराचे आरोप केले जात आहेत, अशा बोलण्याला मी किंमत देत नाही, असे

आढळराव पाटील यांनी स्पष्ट केले.

मी राजकारणात सक्रिय आहे. दररोज लोकांना भेटतो, रविवारी जनता दरबार नित्यनेमाने सुरू आहे. गावागावात विकास कामांसाठी निधी दिला जातोय. मी सक्रिय राहणार व पुन्हा येणार 2029

मधील लोकसभा निवडणुक लोकांना वाटले तर लढवणार असून त्या चुकीचे काय असा सवाल त्यांनी केला. शिरूर लोकसभा मतदारसंघातील विकास कामांचा पाठपुरा केला जात नाही.

विशेषता 2019 पासून पुणे-नाशिक रेल्वेचा प्रश्न प्रलंबित आहे असे सांगून पाठपुरावा का होत नाही हे जनतेला समजले पाहिजे. असे त्यांनी सांगितले.

शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेल्या पत्रकार परिषेदेत आढळराव पाटील यांनी विविध विषयांना स्पर्श केला. मागील 20 वर्षांच्या राजकारणात एक रुपया खाल्ल्याचा आरोप माझ्यावर झाला नाही. खासदार नसताना सुद्धा मंचर नगरपंचायतीसाठी 100 कोटींचा निधी आणला आहे. शहराच्या पाणीपुरवठा योजनेसाठी 136 कोटी मंजूर

केले. मात्र काही जण मंचर नगरपंचायतीच्या कामात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करताहेत. या कामांची टेंडर निघून ती पूर्ण होत आली आहेत.

मग आताच भ्रष्टाचाराचा आरोप कसा होतो, असा सवाल करून ते म्हणाले निवडणुका लवकरच होणार आहेत. संबंधितांनी ठेकेदाराकडे 10 लाख रुपयांची मागणी केली होती. ते न दिल्यानेच भ्रष्टाचाराचे आरोप केले आत आहेत, अशा बोलण्याला मी किंमत देत नाही, असे आढळराव पाटील यांनी स्पष्ट केले.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

सोमवार दिनांक 12/05/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# एससीडीएलचा सिल्वर जुबली कार्यक्रम

## कौशल्य प्रशिक्षणा मुळे व्यसनाधीन लोकांच्या पुनर्विकासासाठी मदत मुक्ता अवचट - पुणतांबेकर यांचे विचार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे "कौशल्य प्रशिक्षण हे व्यसनाधीन लोकांच्या पुनर्विकासासाठी मोठया प्रमाणावर काम करते, या लोकांकडे नीट लक्ष देऊन त्यांना कौशल्य प्रशिक्षण दिले तर ते सुद्धा चांगले आयुष्य जगू शकतात, असे विचार मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्राच्या संचालिका मुक्ता अवचट पुणतांबेकर यांनी व्यक्त केले. सिंबायोसिस ओपन एजुकेशन सोसायटीचा 18 वा स्थापना दिन, सिंबायोसिस सेंटर फॉर डिस्टन्स लर्निंगची सिल्वर जुबली आणि सिंबायोसिस स्किल अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटी किवळेच्या नवव्या वर्धापनदिनानिमित्त किवळे येथील सिंबायोसिस स्किल्स अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटीच्या ऑडिटोरियम मध्ये आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. अध्यक्षस्थानी सिंबायोसिस ओपन एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ शा. ब. मुजुमदार हे होते. तसेच सिंबायोसिस ओपन एज्युकेशन सोसायटीच्या प्रिन्सिपल डायरेक्टर डॉ. स्वाती मुजुमदार या उपस्थीत होत्या.




यावेळी एससीडीएलच्या सिल्वर जुबली लोगोचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. मुक्ता अवचट पुणतांबेकर म्हणाल्या, सिंबायोसिस सेंटर फॉर डिस्टन्स लर्निंग हे कौशल्य प्रशिक्षण देऊन अनेक युवकांच्या आयुष्यात खूप मोलाचा बदल करत आहे. कौशल्य प्रशिक्षण घेऊन त्यांची आर्थिक परिथिती सुधारून सुंदर आयुष्य जगात आहेत."

डॉ. स्वाती मुजुमदार म्हणाल्या, "तळागाळातील लोकांना आम्ही कौशल्य प्रशिक्षण देत आहोत, हे प्रशिक्षण देताना व्यवसाय व बाजारातील मागणी चे भान ठेवले आहे आणि त्यानुसार प्रशिक्षण देत आहोत. दुर्गम भागात शिक्षण पोहचवण्या करतात ऑनलाईन लर्निंग हे महत्वाचे ठरत आहे. सिंबायोसिस सेंटर फॉर डिस्टन्स लर्निंगला झालेली २५ वर्ष यात अतिशय मोलाची भूमिका बजावतात. पुढील पाच वर्षात नवीन दिशा घेण्याची गरज आहे. 'एजुकेशन ऑन डिमांड' - शिक्षणा बरोबर अधिक कौशल्य प्रशिक्षणाची गरज आहे. सिंबायोसिस सेंटर फॉर डिस्टन्स लर्निंग मध्ये आता आपण सर्टिफिकेट आणि डिप्लोमा देत आहोत पण पुढील दोन वर्षात याचे ओपन युनिव्हर्सिटी मध्ये परिवर्तन करून मुलांना




डिप्लोमा न देता डिग्री दिली जाईल असा माझा भविष्यासाठीचा मानस आहे".

शा. ब. मुजुमदार म्हणाले," एससीडीएल सोबत खूप लोक जोडली गेली आहेत आणि त्यात आमचे कर्मचारी अतिशय महत्वाची भूमिका बजावतात. २५ वर्ष हा काही सोपा प्रवास नाही. हि भाग्याची गोष्ट आहे. आमच्या सोबत येणाऱ्या बऱ्याच लोकांनी सुचवलेल्या गोष्टी करत गेलो आणि त्याला लोकांनी खूप मोठा प्रतिसाद दिला, पाहता पाहता विद्यार्थी संख्या २ लाख पर्यंत गेली. प्रत्येक शिक्षण संस्थेकडे सांगण्यासाठी स्वतःचा आपला प्रवास असतो. आमचा हा प्रवास स्पष्ट दूर दृष्टी पासून सुरु झाला, समाजातील या बदलांन प्रमाणे आपण बदलणे गरजेचे आहे." यावेळी त्यांनी अनिल अवचट यांच्या आठवणींना देखल उजाळा दिला.

कार्क्रमात निखिलेश कुलकर्णी, योगेश जोशी, हेमंत सेठिया, अतुल उपाध्याय या माजी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच गायत्री पिल्लई, दिलीप शर्मा, ऋतुपर्ण मुखर्जी, नमिता कडू, मधुरा जोशी, ज्योतीका कोळतकर, यश केंजाळे या उत्तुंग यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा हि या वेळी सत्कार करण्यात आला. २५ वर्ष व अधिक वर्षांपासून जोडलेल्या कर्मचाऱ्यांचा हि या वेळी सत्कार करण्यात आला, या मध्ये रजिस्ट्रार कुंभार, नूतन गोरे, सुनील धुमाळ, रवींद्र शेलार, भास्कर निकम हे होते. १० वर्ष व अधिक कर्मचाऱ्यांनमध्ये सुहास भोसले, पदंप्रिया इरावती, यांचा सत्कार करण्यात आला. १५ वर्ष व अधिक कर्मचाऱ्यांनमध्ये आमला किरण जोशी यांचा सत्कार करण्यात आला. ३० वर्ष व अधिक कर्मचाऱ्यांनमध्ये प्रदीप डोळस, प्रमोद भोसले, शोभा अमोल यांचा सत्कार करण्यात आला.

पुढील कार्यक्रमात एससीडीएल इमारतीच्या मिनिएचरचा केक कापण्यात आला. या वेळी कर्मचाऱ्यांनी आयोजित केलेल्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमाला उपस्थितानी भरभरून प्रतिसाद दिला. शालिनी नायर यांनी सूत्रसंचालन केले. निवृत्त मेजर सोनाली कदम यांनी यांनी आभार मानले.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत


सोमवार दिनांक 12/05/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

## पिंपरी चिंचवड शहरात राहणारी अलिशा पठाण मिस इंडिया या सौंदर्य स्पर्धेच्या शर्यतीत सामील

# सामान्य घरातून आलेली अलिशा पठाण ठरली महाराष्ट्राची शान



मिस ग्रँड इंडिया या सौंदर्य स्पर्धेच्या मंचावर जाणे हे अनेक मुलींची स्वप्ने असतात, याच स्वप्नांचा पाठपुरावा पिंपरी चिंचवड शहरात राहणारी अलिशा पठाण यांनी केला आहे. सामान्य घरातून आलेली मास्टर्स डिग्री मिळविणारी आपल्या स्वप्नांची पूर्तता करण्याच्या मार्गावर असलेली इंडियाच्या मंचावरून महाराष्ट्राचे नाही तर आपल्या देशाचे प्रतिनिधित्व करणारी युवती ठरली आहे.पिंपरी चिंचवड शहरात राहणारी अलिशा पठाण हि नुकतीच मिस इंडिया या सौंदर्य स्पर्धेच्या शर्यतीत सामील झाली आहे. एकूण 6000 स्पर्धकांच्या शर्यतीतून मिस ग्रँड इंडिया या स्पर्धेसाठी आलिशापाठाण हीची निवड झाली आहे.



तिने आपला हा प्रवास प्रसार माध्यमांकडे मुलाखत देताना मांडलाय, लहानपणापासूनच अभिनयाची आणि मॉडलिंग क्षेत्राची आवड यातूनच अनेक फॅशन शो नृत्य आणि अभिनय स्पर्धेमध्ये तिने भाग घेतला आहे तसेच अनेक वेळा ऑडिशन दिल्या.सध्या अलिशा पठाण ग्लोबल हेल्थ सेक्टरमध्ये ग्लोबल हेल्थ मॅनेजर म्हणून काम करते, जिथे ती जागतिक आरोग्य धोरणे, विमा पॉलिसीज आणि पब्लिक वेल-बीइंग यांचा दुवा जोडते. अलिशा पठाण पहिल्या पिढीतील पोस्टग्रॅज्युएट आहे, जिने हॉस्पिटल ॲण्ड हेल्थकेअर ॲडमिनिस्ट्रेशनमध्ये M B A पूर्ण केला आहे.लहानपणापासूनचअलिशा पठाण हिला अभिनय, मॉडेलिंग, नृत्य, ची आवड होती . तिने अनेक फॅशन शो, नृत्य आणि अभिनय स्पर्धांमध्ये भाग घेतला . शिक्षण पूर्ण करत असताना, जसलोक हॉस्पिटलसह दिल्ली, मुंबई, पुणे येथे इंटर्नशिप्स करून अनुभवही घेतला.त्याचबरोबर, तिने ऑल इंडिया युनिव्हर्सिटी योगा चॅम्पियनशिपमध्ये आपल्या विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केले आहे आणि AFMC पुणे येथे “Stress-Induced Aggression Among Healthcare Professionals” या विषयावर रिसर्च बेस्ड ई-पोस्टर सादर करून दुसरा क्रमांक पटकावला आहे. माझे स्वच्छ पुणे, हरित पुणे, आणि सेव्ह वॉटर सारख्या सामाजिक उपक्रमातही तिचे मोठे योगदान आहे.व्यावसायिक आयुष्यासोबतच, अलिशा पठाण एक कुशल नृत्यांगना, योग प्रशिक्षक, कंटेंट रायटर, व्लॉगर, आणि बागकामाची आवड असलेली व्यक्ती आहे.अलिशा पठाण सांगते संघर्षमय, परंतु प्रेरणादायी प्रवासात, माझ्या आई-वडिलांचा आणि मेंटर्सचा महत्त्वपूर्ण पाठिंबा मला नेहमीच मिळाला आहे—विशेषतः माझ्या आईचा, जिने मला प्रत्येक समस्येला सामोरे जाण्याची ताकद दिली.आज मी, एक सामान्य घरातून आलेली, पहिली महिला मास्टर्स डिग्री मिळवणारी, माझ्या स्वप्नांची पूर्तता करण्याच्या मार्गावर आहे. मिस ग्रँड इंडिया च्या मंचावरून मी केवळ अभिनेत्री होण्याचे स्वप्न सोडून नाही, तर एक जागतिक आरोग्य वकिल आणि समाजासाठी काम करणारी व्यक्ती होण्याचा संकल्प घेऊन उभी आहे.माझे ध्येय सीमांपलीकडे जाऊन संस्कृतींना जोडणे, नव्या कथा सांगणे, आणि जगभरातील आवाजांना पुढे आणणे हेच आहे.

**लहानपणापासूनच मला अभिनय आणि मॉडेलिंग क्षेत्राची खूप आवड होती. मी अनेक फॅशन शो, नृत्य आणि अभिनय स्पर्धांमध्ये भाग घेतला आणि अनेक वेळा ऑडिशन्स दिल्या. या सर्व अनुभवांनी मला आज मी जी आहे, ती घडवले. शिक्षणातही मी तितकीच मेहनत घेतली आणि २०२४ मध्ये हॉस्पिटल ॲण्ड हेल्थकेअर ॲडमिनिस्ट्रेशनमध्ये मास्टर्स पूर्ण केले. दिल्ली, मुंबई आणि पुण्यात काम करण्याची संधी मिळाली आणि जसलोक हॉस्पिटलमध्ये इंटर्नशिपही केली. या प्रवासात माझ्या आई-वडिलांचा मोठा पाठिंबा होता. कोणतीही अडचण आली, की मी माझ्या आईकडे मार्गदर्शनासाठी धाव घेत असे. माझ्या मेंटर्सनी मला योग्य दिशा दिली आणि आज मी जशी आहे, तशी घडण्यामागे सर्वांचा मोठा वाटा आहे.**

**अलिशा पठाण**